# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 17 May 2024

# Time 18.10 to 18.20

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक – १७ मे २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातील प्रचाराची उद्या सांगता–सोमवारी मतदान
- मुंबईत आज महायुतीची शिवाजी पार्कवर तर महाविकास आघाडीची बीकेसीवर जाहीर सभा
- सीमा शुल्क विभागाकडून मुंबई विमानतळावरून सुमारे साडे ११ किलो सोनं जप्त

आणि

- मराठवाड्यात पुढचे पाच दिवस वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

****

लोकसभा निवडणुकीच्या राज्यातील शेवटच्या टप्प्यातील प्रचाराची उद्या सांगता होत आहे. राज्यात उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ जागांवर २० मे रोजी मतदान होणार आहे. विविध पक्षांचे नेते आपल्या उमेदवारांसाठी सभा घेत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची थोड्याच वेळात मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर सभा होणार आहे. या सभेला महायुतीच्या नेत्यांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे उपस्थित राहणार आहेत. या निवडणुकीत राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा दिल्यानंतर पहिल्यांदाच ते मोदी यांच्यासोबत एकत्र सभा घेत आहेत.

महायुती तसंच महाविकास आघाडीकडून मुंबईत जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात येत आहे. मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुल –बीकेसीच्या मैदानावर सायंकाळी ६ वाजता महाविकास आघाडीची सभा होत आहे. या सभेला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल उपस्थित राहणार आहेत.

धुळे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी तथा काँग्रेसच्या उमेदवार डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या प्रचारार्थ खा. डॉ अमोल कोल्हे यांनी आज धुळ्यात सभा घेतली.

धुळे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार डॉ.सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री तथा भाजप नेते नितीन गडकरी यांची आज धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा इथं आज सभा झाली. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मंत्री जयकुमार रावल, खासदार डॉ. अनिल गोपछडे, उमेदवार डॉ. सुभाष भामरे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. गेल्या ६० वर्षात काँग्रेसच्या कारकिर्दीत झाली नाहीत एवढी कामं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात पूर्णत्वास आली, यामध्ये रस्ते, सिंचन या योजनांसह मुलभूत सोयी सुविधांच्या कामांचा समावेश असल्याचा दावा गडकरी यांनी केला.

****

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी १ जूनला मतदान होणार आहे. उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील प्रत्येकी तेरा जागा, पश्चिम बंगालच्या नऊ, बिहारमधल्या आठ, ओडिशा सहा, हिमाचल प्रदेश चार, झारखंड तीन जागा आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडच्या एका जागेसाठी सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात मतदान होणार आहे. सर्व टप्प्यातल्या मतदानाची एकत्रित मतमोजणी ४ जून रोजी होणार आहे.

****

उत्तर – पूर्व मुंबई लोकसभा मतदारसंघात १७३ ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला आहे. यामध्ये ८५ वर्षावरील १५६, तर २८ दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

धुळे लोकसभा मतदारसंघात अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या ८९५ कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदान करून घेण्यात आलं.

****

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी आज ठाणे लोकसभा मतदार संघातील निवडणूक तयारीची पाहणी केली. ठाणे जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे तसंच ठाणे लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये यांनी यावेळी चोकलिंगम यांना निवडणूक तयारी विषयीची सविस्तर माहिती दिली.

****

`लोकनिर्णय महाराष्ट्राचा` या कार्यक्रमाचा अखेरचा भाग आज प्रसारित होणार आहे. आजच्या भागात आपण दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

सीमा शुल्क विभागाने १३ ते १६ मे दरम्यान, मुंबई विमानतळावरून ११ किलो ३९० ग्रॅम सोनं आणि प्रतिबंधित सिगारेट्स असा सुमारे सात कोटी सोळा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विविध २७ प्रकरणांत ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आहे.

****

नीती आयोग आणि अटल इनोव्हेशन मिशनच्या वतीनं घेण्यात आलेल्या अटल मॅरेथॉन मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळच्या कुडाळ कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी विश्वजीत अविनाश परीट याने देशात बारावा क्रमांक पटकावला आहे. "कारखान्यांच्या परिसरात होणाऱ्या वायू प्रदूषणावरील उपाय" अशा संकल्पनेवर आधारित विश्वजीतच्या प्रकल्पाची दिल्ली इथं होणाऱ्या `स्टुडन्ट इंटरप्रन्युअरशिप प्रोग्रॅम`साठी निवड झाली आहे. अटल मॅरेथॉनसाठी देशभरातून शंभर कल्पना निवडण्यात आल्या आहेत.

****

आषाढीवारीसाठी सोलापुरात येणारे वारकरी आणि भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पालखी मार्गावरील तसंच पंढरपूर शहरातील बेकायदा जाहिरात फलक तत्काळ हटवावेत तसंच अधिकृत फलकांचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे निर्देश सोलापूरच्या

अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी दिले आहेत. आषाढवारी पूर्वनियोजनाबाबत पंढरपूर प्रांत कार्यालयात झालेल्या खातेप्रमुखांच्या प्रशासकीय बैठकीत त्या आज बोलत होत्या. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी मार्गावरील रस्त्याची कामे तत्काळ पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

****

धाराशिव जिल्ह्यात मे महिन्यात उन्हाची तीव्रता वाढत आहे, एकीकडे अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्यामुळे उष्णतेच्या झळा कमी झाल्या असल्या तरीही पाणीटंचाईच्या झळा अजूनही वाढलेल्याच आहेत. याबाबत आमचे प्रतिनिधी देविदास पाठक यांनी घेतलेला हा आढावा –

***धाराशिव जिल्ह्यात मे महिन्यात उन्हाची तीव्रता वाढत आहे. एकीकडे अवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्यामुळे उष्णतेच्या झळा कमी झाल्या असल्या तरीही पाणीटंचाईच्या झळा अजूनही वाढलेल्याच आहेत. जिल्ह्यातल्या ९० गावात १३२ टँकर्सच्या सहाय्याने पाणीपुरवठा केला जात असून ४४७ गावात ८३२ विहिरी आणि विंधन विहिरींच्या अधिग्रहणातून पाणीपुरवठा होत आहे. यात सर्वाधिक ४० टँकर भूम तालुक्यात तर चार टँकर तुळजापूर तालुक्यात सुरू आहेत.***

***धाराशिव जिल्ह्यातील २२६ सिंचन प्रकल्पांपैकी ७१ प्रकल्प कोरडे पडले असून १०६ प्रकल्पात जोत्याखाली तर ३४ प्रकल्पात २५% पेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.***

***देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव***

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज मान्सूनपूर्व तयारीचा तसंच खरीप हंगामाच्या नियोजनासंदर्भात आढावा घेतला.

महानगरपालिका, नगरपालिका, तालुका ते गावपातळीपर्यंत पावसाळापूर्व उपाययोजनांची कामे येत्या १ जूनपर्यंत पूर्ण करावीत. संपर्क आणि समन्वयाची योजना तयार ठेवून संभाव्य आपत्तीच्या निवारणासाठी सर्व विभागांनी सज्ज रहावे, असे निर्देश स्वामी यांनी आज सर्व यंत्रणांना दिले.

त्याचबरोबर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी पीक कर्ज उपलब्धतेसाठी कर्ज नूतनीकरण करुन घ्यावं, असं आवाहन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. पीक कर्ज देतांना बँकांनी संवेदनशीलतेने प्रकरणे हाताळावीत अशी सूचना त्यांनी कहरीप हंगाम आढावा बैठकीत केली.

****

मराठवाड्यात नांदेड, लातूर, धाराशिव, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात पुढचे पाच दिवस वादळी वारा, मेघगर्जना तसंच विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उद्या १८ मे नंतर विभागाच्या तापमानातही तीन ते चार अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता असल्याचं, परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाने कळवलं आहे.

****

राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे सुमारे साडेपाच हजार हेक्टरवरील शेती आणि फळपिकांचं नुकसान झालं, तसंच १९ जिल्ह्यातल्या उन्हाळी पिकं आणि फळबागांना फटका बसला आहे. अवकाळी पाऊस अजूनही सुरूच असल्यामुळे नुकसानीचा आकडा वाढण्याचा अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे.

****

शेतकऱ्यांनी १ जूनपर्यंत कापसाची लागवड करु नये असं आवाहन बीड कृषी विभागाच्यावतीनं करण्यात आलं आहे. राज्याच्या बहुतांश भागात सध्या अवकाळी पाऊस होत आहे. कपाशीवरील शेंदरी बोंडअळीच्या नियत्रंणासाठी ही खबरदारी घ्यावी असं विभागातर्फे सांगण्यात आलं आहे.

****

श्री तुळजाभवानी देवस्थान दानपेटी घोटाळा प्रकरणी १६ दोषींवर तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश न्यायालयानं दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड संघटक सुनील घनवट यांनी केली आहे. ते आज धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते.

****